ॐ

।। श्री गुरु कृष्ण सरस्वती दत्त स्वामी महाराज प्रसन्न ।।



# ।। स्वांतःसुखलहरी ।।

~* कृष्णदास *~

(सुदेश चोगले)

(लेखनकाल:- ७.९.२०१२ ते २३.९.२०१२)

ॐ

।। श्री गणेशाय नमः ।।

।। श्री सरस्वत्यै नमः ।।

।। श्री सद्गुरुनाथाय नमः ।।

ॐ नमो श्री गुरुदेवा । अमूर्ताच्या मूर्त भावा ।

आत्मरुपाच्या अर्पिसी विभवा । तुज नमन साष्टांग ।।१।।

स्वरूपस्थितिसी रमविसी जीवा । निरंजनाच्या नेसी ठावा ।

नलगे काही लागे द्यावा । पाहसी केवल शुद्ध भाव ।।२।।

स्मरण तुझे होता क्षणीच । मागणे सर्व जाते विलया ।

प्रेम आठव होता चित्ता । अष्टभाव दाटती ।।३।।

जीव तव कृपांकित । होता जाते दैन्य त्वरित ।

अष्टैश्वर्य अष्टसिद्धि । चरणासी लोळंगत ।।४।।

तव कृपेचा महिमा । वर्णवेना देवमानवा ।

वेदही झाले नम्र । मूक भाव स्वीकारुनि ।।५।।

नेति नेति इति बोलता । तुझे रुप वर्णिले सार्था ।

स्वसंवेद्य स्वानुभवेचि । स्थिति ती दाखविसी ।।६।।

मौन हेचि तुझे स्वरूप । जाणवे होता एकरुप ।

शब्दातीत अवस्था । अनुभव दाविसी खूण ।।७।।

सहजस्थिति स्वीकारुनि । राहसी गुप्त जनीवनी ।

शरणांगत जीवा उपदेशुनि । उध्दरुनि नेसी सहजीच ।।८।।

रुप तुझे अनिर्वाच्य । स्थितिही अनिर्वाच्य ।

अनुभवता तव कृपे । स्थिति लाभते अनिर्वाच्य ।।९।।

आपणासम करिसी । या कारणे बोलती ।

दाता तुजसम दुजा । नाही नाही त्रिभुवनी ।।१०।।

मायेतुनि सोडविसी । नाही ऐसा सक्षम दुजा ।

जन्ममरणाच्या आवर्ती । सोडविसी तुचि एक ।।११।।

सगुण ब्रह्म देह तुझा । निर्गुण ब्रह्म अवतार तुझा ।

सगुणेचि निर्गुण । भक्ति सोपान सुलभ सहजा ।।१२।।

तूचि होउनि तुज जाणावे । तूचि होउनि तुज भजावे ।

यापरते ना अन्य भजन । जे आवडे तुज गुरुदेवा ।।१३।।

चतुर्दशी पौर्णिमा । कलांचा भेद जो का ।

तोचि राखुनि स्वेच्छे । जगती लीला दाखविसी ।।१४।।

कला जरी निम्न । प्रकाशा ना उणीव ।

तेवि बोधा ना उणे । जरी द्वैत स्थितिसी उतरसी ।।१५।।

दृष्टी तव कृपामय । स्थिति तव आनंदमय ।

द्वैतभावा येवुनि । अद्वैत स्थिति अनुभवविसी ।।१६।।

देणे येथ नाही व्यवहार । कृपादान सहज स्वभाव ।

क्रिया न घडता बोधप्रदान । हे वैशिष्ट्य गुरुदेवांचे ।।१७।।

विवेकाचे अधिष्ठान । हृदयकपाट निवासस्थान ।

अंतरीच ज्ञानदीप । मार्गी चालविसी सावकाश ।।१८।।

चालविसी म्हणता वृथा । भ्रम नाशिसी सर्वथा ।

मूलस्थान करुनि प्रकट । जाण त्याची देसी ।।१९।।

ज्ञान बोध अंतरी । प्रकट स्वरूप हृदयांतरी ।

तेचि तू अनुभवसी । वसुनि शिष्या अंतरी ।।२०।।

द्वैत-अद्वैत गुरु-शिष्य । भेद केवळ नाममात्र ।

द्वैतात येवुनिही । अद्वैत स्थिति न सांडिसी ।।२१।।

ज्ञान हे सत् स्वरूप । जग हे चित् स्वरूप ।

आनंद हे नित्य स्वरूप । तिन्ही गुण तुझे ठायी ।।२२।।

याचिकारणे तव कृपे । लाभे जीवा नित्यानंद ।

सच्चिदानंद अभिधाने । तुज स्तविती तिन्ही लोकी ।।२३।।

तू कृपादृष्टी अवलोकिता । त्रिपुटी नासे त्वरिता ।

त्रिपुटी रहित तत्वता । जग सारे आत्मरुप ।।२४।।

कृपा तुझी होता । भान जाते विलया ।

भाना अभावी स्तुति । कैसी संभवे स्वामीया ।।२५।।

अद्वैती ते रमणे । मी-तू पण जेथ उणे ।

स्वानंदसुख भोगणे । एकलेचि ।।२६।।

ते ऐक्य नावडे जीवा । म्हणुनि यावे द्वैत भावा ।

चंद्र-सिंधूचा दुरावा । कल्लोळ आणी प्रेमाचे ।।२७।।

प्रेमकल्लोळी पहुडता । सुखतरंगी लोळता ।

गुरु-शिष्य एकांता । सुख ते काय वर्णू ।।२८।।

श्रीगुरुची प्रेमदृष्टी । शिष्यह्रदयी भाववृष्टी ।

एकांती मिळोनि । मिळतचि राही ।।२९।।

संयोगावरी वियोग । वियोगावरी संयोग ।

ऐक्यस्थितिचा भोग । हे खेळणे द्वैताचे ।।३०।।

ऐक्यस्थिति दाविसी । द्वैतस्थिति परतविसी ।

द्वैत-अद्वैत लीला । खेळ तुझा निरंतर ।।३१।।

शिष्या काय बोली । तुजसीच ना रमवे अद्वैती ।

याकारणे शिष्यस्थिति । ना दवडीसी सहसा ।।३२।।

सोऽहंभाव दाविसी सोयी । परि नेदी रमू तया ठायी ।

अहंकार हा तुझा । उठावतो प्रेमापायी ।।३३।।

ते प्रेमसुख माधुरी । न संडवे दोहि ठायी ।

द्वैतभान राखण्या । करती आटाटी ।।३४।।

जीवाशिवाच्या भेटी । नासते त्रिपुटी ।

प्रेमसुख ओहोटी । परी तेथ ।।३५।।

स्वानंदसुख भरती । परि प्रेमसुख आटी ।

द्वैतभान घोटी । याचिकारणे ।।३६।।

गुरु-शिष्य भेटीअंती । जे द्वैतभान उठी ।

प्रेमसुख रसास्वाद । सेवी ते ही स्थिति ।।३७।।

अद्वैती स्वरूपभान गोडी । द्वैती विरहभान जोडी ।

ह्रदयकुहरी तीव्र । तळमळ उठे ।।३८।।

मीन जळासी झाली तुटी । बाळ मातेसी झाली तुटी ।

तेवी हृदयस्थिति । वर्णिता न ये ।।३९।।

स्फुंदे रडे । अवलोकी चोहीकडे ।

विमनस्क अवस्थे । शिष्य कालक्रमणा ।।४०।।

अंतरीचे ओघळ । हृदय करी निर्मळ ।

जन्मजन्मांतरीचे संस्कार । धुवोनि टाकी ।।४१।।

मग प्रकटे स्वानंद स्थिति । जिची अंतर्यामी वसती ।

कले कलेने होय प्रकट । लक्षणे बाह्यवरी ।।४२।।

शुद्ध होय अंतर । गुरु-शिष्य मिटे अंतर ।

एकत्वभान क्षणेक्षणे । वृद्धि होय आपैसे ।।४३।।

गुरु देह शिष्य देह । खोळ दिसे भिन्न भिन्न ।

परि अंतर्यामी एकत्व । न सांडी सर्वथा ।।४४।।

मग जेथ जेथ जाय दिठी । गुरुत्व भाव तेथ उठी ।

चहूकडे गुरुविना । दर्शन स्फुरण अन्य नुठी ।।४५।।

हृदयसिंहासनी विराजित । दिसे निजसद्गुरुनाथ ।

बाह्य जगती व्यापुनिया । तोचि दिसे रुपारुपात ।।४६।।

मी द्रष्टा, दृश्य सद्गुरु । भावाचा या येई पुरू ।

दर्शन सुख तेचि । भावना हृदयांतरू ।।४७।।

जगती वर्तता ही स्थिति । एकांती स्वस्थ श्रीगुरुमूर्ती ।

हृदयस्थ अखंडित । व्यापुनिया तीच स्थिति ।।४८।।

मौनत्वे रहाणे । अथवा वाचाळ वर्तणे ।

दोही स्थितित । आत्मत्वे मौन अंतरी न संडे ।।४९।।

सद्गुरु मूर्तीचा ध्यास । तेचि चिंतन प्रतिक्षणास ।

विस्मरण ह्या अवकाश । घेवुनि पुन: स्मरण उठी ।।५०।।

ह्दयी भावे सगुण । अंतरी खूण निर्गुण ।

सगुणाचे खेळी । ऐसा निर्गुणी लोळी ।।५१।।

सोऽहम् सोऽहम् उमाळे । प्रणव ध्वनि अंतरे ।

अर्धमात्रेवरी वेळोवेळे । स्थित होय ।।५२।।

स्वानंदसुखाच्या लहरी । रोमांचित प्रकट तनावरी ।

काल-जगत् भान नुरवी । ते स्थिति अवर्णनीय ।।५३।।

सद्गुरु कृपाबळे । शिष्य अनुभवी खेळे ।

कृतज्ञते भरुनि ये । शिष्य ह्दय वेळोवेळे ।।५४।।

आणून दिधले ऐसे नाही । प्रकट केले ऐसे नाही ।

दाखविता सोयी । प्रकटले आपेआप ।।५५।।

शरणता कारण त्यास । ह्दयी अखंड सद्गुरु ध्यास ।

मी-पणाचा झाला नास । उरले केवल स्वरूप ।।५६।।

तेचि स्वरूपसुख गोडी । चाखावया जीवा आवडी ।

परि चुकलासे उगमी । म्हणोनि दुख:यातना ।।५७।।

विषयद्वारे सुख भोगे । परि अंती दु:ख रोकडे ।

परि तमांधी । भान गळे ।।५८।।

भोगिता ते अचानक । पूर्वसुकृत उगवे कडे ।

सत्संग घडे जोड । सद्वाक्य श्रवणी पडे ।।५९।।

तोचि पहाट संधिप्रकाश । तिमिरावरण भेदून ।

जाणीवे दे भान । विवेकाचे ।।६०।।

विवेकाचे आधारे । पाउलोपावली ।

जाणीव क्रमी । वाट शुद्धतेची ।।६१।।

शुद्ध बुद्धि करी । योग्यायोग्यतेचा निवाड ।

परि पूर्वस्मृती संस्कारे । इंद्रिये खेचिती विषयमेळी ।।६२।।

द्वंद्वात्मक स्थिति । पराभव जीवा अंती ।

तेचि वेळी होय पहाट । उगवे सद्गुरुराज भानू ।।६३।।

भासे जरी प्रथम भेट । असे तो प्राचीन ।

जन्मजन्मांतरी विलोकित । शिष्यवरा ।।६४।।

तेचि खूण पटवी । ठेविता मस्तकी पद्मकरा ।

स्वसंवेद्य स्वरूपस्थितिते । दावुनि पुन: दवडी ।।६५।।

दाविण्याचे प्रयोजन । लावण्या स्वरूप गोडी ।

दवडिण्याचे प्रयोजन । शुद्धता ना तेवढी ।।६६।।

करुनिया बोधप्रदान । देवोनिया अभ्यास जोडी ।

मोक्षसोपान द्वार उघडी । पश्चिमवाटे ।।६७।।

प्राणशक्ति चक्रभेदी । चढे उर्ध्वपंथे ।

अग्नितंतू क्रमे वाट । सहस्रारीची ।।६८।।

जीवा ना ते सामर्थ्य । कृपाशक्ति सद्गुरुंची ।

उफराटी उर्ध्व । वळविली नागीण ।। ६९।।

शरीरीच असता । ना कधी जाणीव ।

परमेश्वरी लीला । अगाध ।।७०।।

अति खडतर योगाभ्यास । अनंत काळचा ।

परि ना जे शक्य । कदाकाळी ।।७१।।

ना अभ्यासबळे ना स्व:सामर्थ्ये । ना जी उलटवू शके ।

होय ते साध्य सहजी । केवळ सद्गुरुकृपास्पर्शे ।।७२।।

ना केवल पलटविली । सवे चक्र भेदन ।

मूलाधारावरून थेट । नेली ब्रह्मरंध्री ।।७३।।

शिष्यादेही ताटस्थ्य । श्रीगुरु भानविरहित ।

शक्ति संक्रमण । घडे आपैसे ।।७४।।

स्वानुभवावस्था । शिष्या दे तात्काळ ।

दाता ना दुजा । नाही ऐसा त्रिभुवनी ।।७५।।

नवजन्म जणू शिष्या । श्रीगुरु जननी जनिता ।

जन्मताचि मुखी । स्वरूपस्थिति मधुबिंदू ।।७६।।

जन्मताचि शिशू हो प्रौढ । ते मायपित्या केवी आवडे ।

हसे रडे खेळे बागडे । त्यातचि असे आनंद ।।७७।।

तेचि स्थिति येथे । भोगण्या तो आनंद ।

श्रीगुरु आणी शिष्या । पूर्वस्थिति भानावरी ।।७८।।

घाली जीवनसंग्रामी । दावुनि साधनमार्ग ।

चढे पडे शिष्य । सद्गुरु विलोकी कवतुके ।।७९।।

देई स्मरण विस्मरण । मायाजाली परीक्षण ।

मग कृपेचे अवतरण । क्रमाने घडे ।।८०।।

विषयबुद्धी संस्कार नाश । शक्य ना एका क्षणात ।

स्वरूपस्थिति स्वाद घेता । क्षणोक्षणी घट ।।८१।।

प्रथम बंध मनाचा । संकुचित भाव त्याचा ।

महत् जाणीव घ्याया । सर्वथा अपात्र ।।८२।।

स्वरूपस्थिति स्वयंसिद्ध । परि मन जे बद्ध ।

आनंद स्थितिते करी । सर्वदा अवरुद्ध ।।८३।।

त्यास काय करील श्रीगुरु । स्वत:च स्वत:ते उद्धारु ।

भावार्थ हा गीतेचा । ध्यानी ध्यावा ।।८४।।

नसता साह्यकारी मन । जप ध्यान आसन ।

अस्थिरतेने सर्व । व्यर्थ होय ।।८५।।

बाह्य जगत ते एक । अंर्तजगत कल्पिते मन ।

द्वंद्वस्थिति क्षणभर । निवांतता न दे ।।८६।।

तेथ साक्षित्वे रहावे । सारे केवल विलोकावे ।

अभ्र जाती विरोनि । कालांतरे ।।८७।।

ते काळपर्यंत चिकाटी नेटे । आसन न सोडावे हट्टे ।

मग रमणे होय । निरभ्र गगनी ।।८८।।

गगन व्यापुनिया सर्व दिशे । परि पाहो जाता काही नसे ।

तैसे विचार आटता । मन हे नसे ।।८९।।

तेथ उरे केवल । शुद्ध साक्षित्व जाणीव ।

स्वरूप स्वसंवेद्यता । अनुभव तेथ ।।९०।।

तेथ रमणे होय काही क्षण । पुनरपि अभ्रावरण ।

साक्षित्व ना सोडता । पुनरपि निरभ्र होय ।।९१।।

अभ्यास करावा जरी स्वयेचि । तेथ श्रीगुरुचि काय थोरी ।

ऐसा प्रश्न बद्ध मन । सहजी करी ।।९२।।

तरी त्यासी उत्तर । प्रथम स्वरूप चवी दाविली तेणे ।

विवेक दातारु सद्गुरु । दुजे कार्य आत्मानात्म विचारु ।।९३।।

आत्मबल विरहित साधका । श्रीगुरु भान पाठिराखु ।

साधनमार्गी दे बळ । निरंतर ।।९४।।

श्रीसद्गुरु स्मरण । अतिप्रसन्नतेचे कारण ।

साधन संग्रामी दारुण । उभारी दे नित्य ।।९५।।

शिष्य बुद्धी जो देहसीमित । त्यासी सगुण स्मरण भावत ।

मुखचंद्रमा ध्याता स्मरता । प्रफुल्लता त्वरित ।।९६।।

श्रीगुरु नव्हे देहाकार । तत्व व्यापक सर्वाकार ।

निजहृदयीच भावता । सुलभ कार्य ।।९७।।

तेथ बाह्य जाणीव । हळुहळू हो देहसीमित ।

अभ्यासे निरंतर । होय हृदयस्थ ।।९८।।

श्वास रोधिता मन रुद्ध । हे सामान्य अनुभव ।

परि नाथपंथीची । उलटी खूण ।।९९।।

सुरु तेथ शक्तिचा प्रांत । शिष्य होय तिचे यंत्र ।

नाथपंथीच्या साधनेचे । तेचि ते तंत्र ।।१००।।

प्राणशक्तिचा जागर । तिचा मुक्त संचार ।

घेऊनिया आधार । पवन चाले ।।१०१।।

रोधिण्याचे काय कारण । होता शक्ति जागरण ।

पवन शक्तिचा अकिंत । मनाचा काय पाड ।।१०२।।

पवन होता मंद । मन गति मंद ।

जाणीव हो केंद्रित । ह्रदयस्थ ।।१०३।।

तेचि श्रीगुरुचे स्थान । महदाकार भान ।

देहाचीही तेथ । जाणीव गळे ।।१०४।।

ना अंगुळांचा विचार । ना जपाचा आधार ।

धारणेचा ना प्रकार । आयतेचि सुख ।।१०५।।

हे कोणे केले । सहजीच झाले ।

परि अनुभविले । सद्गुरुकृपे ।।१०६।।

निवांतचि निवांत रमले । शांतिते शांतिसी भोगिले ।

काल भान लोपले । ती ही स्थिति ।।१०७।।

जाणीव ते ह्रदयस्थ । जाणता तो ह्रदयस्थ ।

जाणीव जाणत्यासी । मिळोनि गेली ।।१०८।।

तेथ काय ती स्थिति । जाणताचि विराला ।

अनिर्देश्यता तेथ । काय बोलणे ।।१०९।।

परि सूक्ष्म भान तेथ । स्वात्मसुखाच्या लहरी अमित ।

अनुभविण्या तेचि । द्वैताचा आधार ।।११०।।

निर्गुणाचि गोडी । पुन: पुन: आवडी ।

सेवोनियाही सेवी । परि अतृप्तता ।।१११।।

चतुर्दशी पौर्णिमा । खेळ चाले पुन:पुन: ।

शिष्य तटस्थ आसनस्थ । बहुकाळ दिसे जना ।।११२।।

पौर्णिमेसी कसा गेला । चतुर्दशीसी कोणे आणिला ।

श्रीगुरुचि करी । द्वैताद्वैताची ही लीला ।।११३।।

सत्‌शिष्या ते वेळे । मी-पणाचा भाव नुठला ।

मी-पणा अहंकार उठे । शिष्य तो बुडाला ।।११४।।

शुद्ध जाणीव अन् नेणीव । खेळी त्या नित्य रमता ।

भाव मुरला स्थिति मुरली । मी-पणा समूळ नुरला ।।११५।।

विश्वरंग मनतरंग । अनुभविता आत्मरंग ।

लोप होऊनि निशे:ष शिष्य । महाशून्यी निशे:षला ।।११६।।

निशे:ष होता शेष काय । ते वर्णिले कसे जाय ।

वर्णिता तो कोण तेथ । अनिर्वाच्य ते हे स्थिति ।।११७।।

येणे-जाणे नसे जेथ । शाश्वतता असे तेथ ।

असणे-अभाव नसे जेथ । नित्यता असे तेथ ।।११८।।

नित्य शाश्वत अनुभव । म्हणावा तरी कसे ।

अनुभव म्हणता व्यर्थ । अनुभवीच विराला ।।११९।।

प्रियतमेचि प्रियेसी भेटी । स्वशरीर ना भान दिठी ।

स्थल-काल-भान विरहित । स्थिति ते जाणीवेचि ।।१२०।।

एकत्वाचि ते जाणीव । परि जाणीवेचि तेथ नेणीव ।

परमसुखाचा कल्लोळ । केवळ उरे ।।१२१।।

त्या आनंदसागरी । स्वरूपसुखाच्या लहरी ।

श्रीगुरु-शिष्य मीलनी । स्वानंद भोग ।।१२२।।

त्या स्वानंद भोगी । आनंद निरुपाधि ।

इंद्रियातीत सच्चिदानंद । दाता केवळ श्रीगुरु ।।१२३।।

हृदयस्थ घे स्व-भान । मनाचे होय विसर्जन ।

भानासी काय आकार । तेचि निराकार ।।१२४।

अनंतता 'त्या'ची । परिमिती ना साची ।

डुबी देता तळ । काही केल्या न लागेचि ।।१२५।।

पलांडू उकलिता । आवरण एकेक गळता ।

अंती उरे काय । केंद्री ।।१२६।।

तेवि आवरण एकेक गळता । परिसीमा शुद्धता ।

केवल ब्रह्म स्थिति । अभ्यासे येतसे ।।१२७।।

शुद्ध शुद्ध अति शुद्ध । जाणीव होय अति व्यापक ।

विश्वाकार स्थिति । अनुभव ।।१२८।।

त्या अनंततेत । विराली सांतता ।

कारण अशुद्ध । भान गळले ।।१२९।।

विकार विरता । स्थिति निर्विकार ।

मनही नुरता । काळ भान लोपले ।।१३०।।

अनुभवता सारे । गोडीसी लाचावे ।

अभ्यासा निरंतर । सहजी होई प्रवृत्त ।।१३१।।

ती ह्रदयस्थाची ललकारी । अवधान स्वये घेई ।

प्रवेशी स्वये । ह्रदयकुहरी ।।१३२।।

ह्रदयस्थ सुखरुप आत्मकंद । भोगिता श्वास अति मंद ।

तादात्म्य तेचि प्राकट्य । ह्रदयस्थाचे ।।१३३।।

सहस्रदलकमली । रुंजी जीवभ्रमर ।

स्वरूपमधुपानी । डोल अंर्तयामी बाह्य ताटस्थ्य ।।१३४।।

तेचि सेवावे निरंतर । स्थितिते मुरावे निरंतर ।

जो पावेतो । ना नित्य सहजावस्था ।।१३५।।

मग देह चाले बोले । कर्म करी ।

परी अंतरी । नित्यावस्था ।।१३६।।

देहदु:ख परम कठीण । अवस्थे हो क्षणीच घसरण ।

त्यापरे जाण्या । मुरण्या लागे अति गहन ।।१३७।।

त्यासाठीच अभ्यास । साधकावस्थे अन् सिद्धावस्थे ।

निरंतर निरंतर । तरीच मुरे ।।१३८।।

देहभाव विरे । तरी अभ्यासी पक्कदशा ।
परी हे नव्हे । सोपी बोली ।।१३९।।
परतत्त्व स्पर्शोनि । जीवदशे उतरे ।
तो अहंकार उठावे । महाभयानक ।।१४०।।
नाना कळा दावुनि । मोही लुभावे ।
अंती घालितसे गर्तेत । विनाशाच्या ।।१४१।।
कारण अभाव शुद्धतेचा । वासना ना विरल्याचा ।
अभाव पूर्ण वैराग्याचा । याचिकारणे मोहबंधन ।।१४२।।
तरी सद्गुरुस्मरण अविरत । विवेक ठेवी जागृत ।
साधन ना मंद करता । नित्याभ्यास ठेवी ।।१४३।।
अनुभव ही गुरुकृपा । तेथ निजसामर्थ्य नाही बापा ।
ही जाणीव जरी नित्यता । कार्य साधे ।।१४४।।
येणे रिती अभ्यास करता । देहभाव विरे पुरता ।
मग देहावरी येता । बळ लागे ।।१४५।।
निरंतर अभ्यासे । तेहि स्थिति ओलांडे ।
आत्मभाव ही तेथ । मुरे पूर्णपणे ।।१४६।।
मग दिसे तो साधारण । ओळखणे महाकठीण ।
ओळख पटे तरीच । जरी दावी स्वत: ।।१४७।।
पदरी अति महापुण्य । तरीच ऐसियाचि भेट होय ।
भेटला तरी विश्वास होय । तेचि महाभाग्य ।।१४८।।

श्रीगुरुंची करुणा । जीवाची होय स्वीकारणा ।

विषयभान सोडुनि । स्वात्मभान देण्या ।।१४९।।

तेचि कारणे । सद्गुरुंची योजना ।

परमेशे । केली असे ।।१५०।।

तयांचे मुकुटमणी । अत्रिसुत दत्तात्रेय ।

चिरंजीव सद्गुरु । अवतार ह्या ।।१५१।।

स्मरणप्राकट्य । असे जयाचे वैशिष्ट्य ।

तो साधकांसी । नित्य साह्यकारी ।।१५२।।

तयासी स्मरता भावे । परमपदाचा मार्ग पावे ।

जाणोनिया शरण जावे । सत्साधके अनन्यभावे ।।१५३।।

ह्रदयाचि अनन्यता । सोमकांता कृपापाझरा ।

कारण होवोनिया । द्रवी सद्गुरु ह्रदय ।।१५४।।

आर्तता जीवाची । करुणेचा पाझर ।

नेतसे उर्ध्व । कृपाहस्त स्वभावेचि ।।१५५।।

त्या परीस स्पर्शा । आतुर तिन्ही लोक ।

तो माथा पडता अवचिता । उदैले काय भाग्य ! ।।१५६।।

स्वये पसरली झोळी । शुद्ध भाव याचना ।

दान देता तेचि । प्रसन्न अत्रिनंदन ।।१५७।।

भक्ति ज्ञान योग मुकुटमणी । दाता निरपेक्ष पूर्णपणी ।

अपूर्णातूनि पूर्ण होण्या । सहाय करी ।।१५८।।

हृदयी स्वयंभू । परि नोहे अनावृत्त ।

दाखवुनि सोयी । करी स्पर्शबोध ।।१५९।।

आकळितो याचना । परि नोहे दातृत्त्वभाव ।

मी-तू पण भेदभाव । जो नाठवे सर्वथा ।।१६०।।

तेथ कैचे कृपादान । न लागेचि अनुमान ।

सोऽहं भाव प्रदान । सहजेचि ।।१६१।।

चुंबकिय कक्षेत । लोहा चुंबकत्व अनायासे ।

सद्गुरु कक्षेत येता । तेविचि विनासायासे ।।१६२।।

परि तेथ नव्हे विकर्षण । स्वरूपाचे आकर्षण ।

तेणे उठे जीव । महाबोधी ।।१६३।।

लघुत्व सांडुनि । गुरुत्व होये तत्क्षणी ।

परी मी-पणाने जीवा । अनुभव विस्मृति ।।१६४।।

लोपण्या विस्मृति । पुन: सत्संगाचि महति ।

सद्गुरुवाक्य मनन चिंतन । हाचि खरा सत्संग ।।१६५।।

सद्गुरुप्रणित साधन । अखंडित सेवन ।

अनुभवस्थितिसी जेणे । होय वृद्धि ।।१६६।।

न अन्यावलंबन । येर ते शाब्दिक ज्ञान ।

अनुभवासी विनाकारण । होय खंडण ।।१६७।।

अखंडित स्थिति । तरलता मनाची ।

राखावी जोपासावी । लागे प्रयत्ने ।।१६८।।

त्रिविध तापाचे आघात । स्थितिते करीत बिघाड ।

वैराग्यासी निश्चयाची जोड । देता सुलभ होय जे अवघड ।।१६९।।

अटळ विधिलेखिता । भोगणे पडे ब्रह्मादिका ।

शांत चित्ताची समता । ही देण गुरुकृपेची ।।१७०।।

जन्मजन्मांतरी कर्म घडले । देहपतनी जे इच्छिले ।

भोगण्या तेचि सारे । पुनरपि जन्मासी आले ।।१७१।।

सद्गुरु कृपाकटाक्षे न्हाले । ते स्वरूपभाना रमले ।

जीवांसी त्या जीवनाचे । क्षण खेळचि गमले ।।१७२।।

परि कारण नित्याभ्यास । सद्गुरु चरणी अढळ विश्वास ।

सोऽहं भाव घेता ध्यास । परमानंदे डुल्लतु ।।१७३।।

तेचि नित्यावस्था श्रीगुरुंची । तेवि होय सत्शिष्याची ।

एकात्मता हृदयकमली । भोगिता भ्रमर नुरला ।।१७४।।

हाचि परमार्थसोपान । ओळता श्रीगुरु दयाघान ।

कृष्णदासे गुरुकृपे । साक्षात् अनुभवला ।।१७५।।

श्री कृष्णसरस्वती दत्त दयाघन । श्रीक्षेत्र करवीर वसतिस्थान ।

तृतिय दत्तावतार । जन्म-जन्मांतरींचा सद्गुरु ।।१७६।।

करुनिया अंगिकारु । माथा ठेविता पद्मकरु ।

लाभता स्वानंदस्थिति । स्वांत:सुखलहरी प्रकटली ।।१७७।।

अधिक भाद्रपद कृष्ण सप्तमी । शके एकोणीसशे चौतीस शुक्रवासरी ।

प्रथम ओवी स्फुरण । जाहले अवचित सद्गुरुप्रेरणे ।।१७८।।

निज भाद्रपद शुद्ध दुर्गाष्टमी । रविवासर पहाटेसी ।

लेखन चतुर्थ बैठकीत । समाप्त जाहले ।।१७९।।

होता प्रथम ओवी स्फुरणा । नव्हती काहीच कल्पना ।

कशास झाली प्रेरणा । श्रीगुरुंचे काय प्रयोजन ।।१८०।।

पूर्ण होता आले आकलना । वदविले परमार्थसोपाना ।

श्रीगुरुंची प्रेरणा । नसे वृथा कदाकाळी ।।१८१।।

स्वांत:सुखलहरी अनुभवमाळा गळी । अर्पिता शोभला श्रीगुरु वनमाळी ।

पाहोनि हास्य श्रीमुखकमळी । शिष्य प्रफुल्लित ह्रदयकमळी ।।१८२।।

ठेवोनि माथा चरणकमळी । कृपादान याचना तळमळी ।

वाचिता स्वांत:सुखलहरी । अनुभवो तैसेचि श्रीगुरुकृपे ।।१८३।।

प्रार्थोनिया श्रीगुरुनाथ । श्रीगुरु कृष्णसरस्वती दत्त ।

कृष्णदास शरणांगत । पदी विनित जाहला ।।१८४।।

।। श्रीगुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

******

**सुदेश चं. चोगले**

**पत्ता: २/२७, चोगले हाऊस, बाभई, बोरीवली (प.) मुंबई ४०००९१  संपर्क: ९८२०९२८१२८**